स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड

मानव्य विज्ञान विद्या शाखे अंतर्गत तत्त्वज्ञान या विषयात पीएच.डी.
पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा सारांश

संशोधनाचा विषय

संत शिरोमणी मन्मथ स्वामींचे तत्त्वज्ञान: एक चिकित्सक अभ्यास

संशोधक मार्गदर्शक

प्रा.डॉ. उपाडे जी.एम.

तत्त्वज्ञान विभाग प्रमुख

बी.रघुनाथ महाविद्यालय ,परभणी

संशोधक विद्यार्थिनी

सौ.रेणुका रविंद्रप्पा ह्याडे

समर्थ नगर ,देगलूर

जानेवारी २०२४

संत शिरोमणी मन्मथ स्वामींचे तत्त्वज्ञान : एक चिकित्सक अभ्यास

1) प्रस्तावना (Introduction)

तत्त्वज्ञान हे मानवी ज्ञानाची मुलभूत शाखा आहे.मानवी जीवनाशी निगडीत असलेल्या सर्व शाखांचा अभ्यास तत्त्वज्ञानात केला जातो.म्हणुन तत्त्वज्ञानाला सर्व शास्त्रांची जननी असे म्हणतात.सामाजिक शास्त्र किंवा साहित्य शास्त्र हि मानवी जीवनाला आशय आणि आकार प्रदान करतात . या अभ्यासशाखेत सत्ता शास्त्र, ज्ञान मिमांसा, तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, सौंदर्यशास्त्र व सामाजिक तत्त्वज्ञान यांचा अभ्यास केला जातो. अश्या सामाजिक शास्त्राची तात्विक बाजु भक्कम करणारी व यास वैचारिक आधार प्राप्त करून देणारी एक महत्वाची अभ्यास शाखा आहे.

संशोधकाने संशोधनासाठी तत्त्वज्ञान या विषयातील सामाजिक तत्त्वज्ञान या अभ्यासशाखेला निवडले आहे. सामाजिक तत्त्वज्ञान या विषयात भारतीय व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानातील मुलभूत संकल्पनांचा अभ्यास केला जातो. भारतीय तत्त्वज्ञान ज्याचा प्रारंभ हा अति प्राचीन काळापासून किंवा या सृष्टीच्या उत्पत्ती पूर्वीचा आहे. भारतीय तत्त्वज्ञान मानव व निसर्ग निर्मित अनेक समस्या ,गूढ रहस्य यांची तात्विक अंगाने उकल केली आहे. यातील प्रत्येक प्रश्न व समस्या यांचे उत्तर तत्त्वज्ञान या विषयाच्या अभ्यास चौकटीत राहून शोधण्याचा प्रयत्न अनेक भारतीय तत्त्ववेत्यानी केला आहे. तो आजही सुरु आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही

मानवी समाजाच्या इतिहासात अनेक मूर्त व अमूर्त कल्पना व विचारधारा आहेत. या विचारधारांना तत्त्वज्ञान असे संबोधता येईल .प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक अश्या विविध कालखंडात अनेक तत्त्ववेत्ते भारतात होवून गेले. ज्यांनी त्यांच्या काळात मानवी मनाला ,बुद्धीला व समाजाला पडलेल्या अनेक प्रश्नांचे उत्तर तर्क,निती ,विवेक ,विज्ञान याच्या आधारे वैचारिक व व्यावहारिक स्वरुपात दिली आहेत .मानवी समाजातील अज्ञान ,दुरित ,अवैज्ञानिक कल्पनांना दूर करून मानवी मनाचा स्व विकसित करण्याचे काम अनेक संतानी सुद्धा केले आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने तत्त्वज्ञान या सामाजिक शास्त्रातील सामाजिक तत्त्वज्ञान या अभ्यास शाखेतील संताचे तत्त्वज्ञान या अभ्यास शाखेशी संबंधित विषय संशोधनासाठी निवडला आहे. सामाजिक तत्त्वज्ञान हे सामाजिक मानवी मुल्यांचा तात्विक अभ्यास करते . संशोधकाने १६ व्या शतकातील संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या तात्विक चिंतनाचा अभ्यास करून तत्कालीन व वर्तमानातील मानवी समस्यावर त्यांच्या चिंतनात कांही उत्तर आहे का याचा अभ्यास व्हावा म्हणून संशोधनासाठी **संत शिरोमणी मन्मथ स्वामींचे तत्वज्ञान : एक चिकित्सक अभ्यास** हा विषय संशोधनासाठी घेतला आहे.

2) संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objectives of Research)

प्रस्तुत संशोधन विषयावर संशोधन कार्य करताना संशोधकाने कांही उद्दिष्ठाना प्रमाण माणून संशोधन कार्यास प्रारंभ केला . ती उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

१) संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करणे.

२) संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या समकालीन तात्विक चिंतनास समजून घेणे

३) संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या तात्विक चिंतनावर पडलेला प्रभाव शोधणे

४) संत मन्मथ स्वामी यांचे सामाजिक व धार्मिक तत्त्वज्ञान जाणून घेणे

५) संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या तत्वज्ञानाची वर्तमानातील उपयुक्तता स्पष्ट करणे

६) संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांचे लिंगायत तत्त्वज्ञानातील योगदान अभ्यासणे

७) संत शिरोमणी मन्मथ यांचे भारतीय चिंतन व विश्वातील योगदान स्पष्ट करणे .

3) संशोधनाची गृहीत कृत्ये (Hypothesis of Research)

१) संत शिरोमणी मन्मथ स्वामीचे जीवन चरित्र अध्यात्मिक व नैतिक प्रवृत्तीचे होते

२) संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांनी त्यांच्या काळातील तात्विक चिंतनाच्या मांडणीस नवीन स्त्रोत प्राप्त करून दिले.

३) संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या तात्विक चिंतनावर वारकरी , बसवेश्वरी आदी तत्त्वज्ञानाचा प्रभाव दिसुन येतो

४) संत मन्मथ स्वामी यांच्या धार्मिक तत्त्वज्ञानास लिंगायत किंवा वीरशैव तत्त्वज्ञान म्हणून ओळखले जाते.

५) संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या तत्त्वज्ञानाची वर्तमानात उपयुक्तता आहे.

६) संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या तात्विक चिंतनाने वीरशैववादी तत्त्वज्ञानास आधुनिकता प्राप्त करून दिली.

4) संशोधन समस्या (Research Problems)

संशोधन समस्या हा कोणत्याही संशोधनाचा आत्मा असतो.कारण संशोधक त्याला पडलेल्या तात्विक ,राजकीय ,आर्थिक ,शैक्षणिक ,सामाजिक इत्यादी प्रश्नांचे उत्तर संशोधनाच्या चौकटीत राहून व शोधून त्यास समाज व राष्ट्राच्या समोर मांडून त्यावर उत्तरे सांगतो. अगदी याच प्रमाणे संशोधकास भारतीय सामाजिक तत्त्वज्ञान या अभ्यास शाखेतील सामाजिक जगाचा तात्विक अंगाने अभ्यास करणाऱ्या तत्त्ववेत्यांच्या जीवन चरित्रांचा अभ्यास करण्याची आवड आहे. आपल्या या आवडीस संशोधनाचा आधार घेवून पूर्ण करता येण्याची संधी पीएच.डी. च्या माध्यमातून प्राप्त होत आहे ,हे ओळखून संशोधकाने मध्ययुगीन भारतीय सामाजिक तत्त्ववेत्यापैकी संत शिरोमणी मन्मथ स्वामी या सामाजिक तत्त्ववेत्यास अभ्यासासाठी निवडले.

या अभ्यासाच्या माध्यमातून १६ व्या शतकात संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांनी कश्या प्रकारे समकालीन सामाजिक, धार्मिक तात्विक चिंतनाचा अभ्यास केला ? या अभ्यासातून त्यांनी नेमकी नवीन कोणत्या सामाजिक व धार्मिक तात्विक चिंतनाची मांडणी केली ? जे तात्विक चिंतन १६ व्या शतकापासून २१ व्या शतकातील समाज मनावर आपला प्रभाव पाडताना दिसुन येते, अशी कोणती तात्विक नाविन्यता ,आधुनिकता त्यांच्या

तत्त्वज्ञानात आहे ? या प्रश्नाचे उत्तर शोधावे म्हणून संशोधकाने हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधक स्वतः ज्या परिसरात मागील ४० वर्षापासून राहत आहे. त्या परिसरातील सामाजिक, धार्मिक व अध्यात्मिक क्षेत्रावर संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या तात्विक चिंतनाचा प्रभाव अधिक दिसुन येतो. जो एका विशिष्ट समाजापुरता मर्यादित नसून त्यात विविधता जाणवते. याची कारणे त्यांच्या जीवन चरित्र व तात्विक चिंतनात सापडतात का ? हे शोधावे म्हणून हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

प्रस्तुत विषय संशोधनासाठी घेण्याचे किंवा या बाबत संशोधकास पडलेल्या वरील विविध प्रश्नाचे उत्तरे शोधण्याचे आणखीन एक महत्वाचे कारण म्हणजे या विषयावर अद्याप कोणीही विद्यापीठ स्तरावर या विषयावर संशोधन कार्य केले नसल्याचे दिसुन आले आहे.

5) संशोधन पद्धती (Research Methodology)

प्रस्तुत संशोधन विषयावर संशोधन कार्य करण्यासाठी संशोधकाने खालील संशोधन पद्धतीचा आधार घेवून हे संशोधन कार्य पूर्ण करण्याचे निश्चित केले आहे.

संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांचा कालखंड १६ व्या शतकातील आहे. ते एक ऐतिहासिक धर्म पुरुष होते. म्हणून यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धती उपयुक्त होईल. तसेच स्पष्टीकरणात्मक, वर्णनात्मक , विश्लेषणात्मक व ग्रंथालयीन अभ्यास पद्धतीचा आधार घेवून हे संशोधन कार्य पूर्णत्वास घेवून जाण्याचा संशोधकाचा प्रयत्न राहील.

6) तथ्य संकलन (Data Collection)

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी तथ्य संकलनातील प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर केला जाईल .

संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांचे जन्म स्थळ, त्यांचे बालपण व इतर कालखंड ज्या परिसरात गेला त्या स्थळास व त्यांच्या समाधी स्थळास प्रत्यक्ष भेट देवून , त्यांचे उपलब्ध हस्त लिखित , पुस्तके यांचा आधार घेवून प्राथमिक तथ्य संकलन केले जाईल .

दुय्यम तथ्य संकलनात संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या जीवन चरित्रावर लिखित ग्रंथ, संपादित पुस्तके, नियतकालिकातील व वर्तमान पत्रात विविध अभ्यासकांनी प्रकाशित केलेले लेख ,मन्मथ स्वामी यांच्या तत्त्वज्ञानाचे अभ्यासक यांच्या सोबत होणारी चर्चा इत्यादीतून प्राप्त तथ्यांचा आधार घेवून हे संशोधन कार्य पूर्ण केले जाईल

7) संशोधनाची मर्यादा व व्याप्ती (Scope & Limitation of Research)

प्रस्तुत संशोधन विषयाची मर्यादा व व्याप्ती स्पष्ट करणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे संशोधनाची चौकट निश्चित होते. तसेच संशोधकाची भटकंती होत नाही. परिणामतः वेळ व पैसा याची बचत होते. प्रस्तुत संशोधन विषयाची मर्यादा व व्याप्ती संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या तात्विक चिंतनाचा अभ्यास करण्यापुरती मर्यादित आहे. तरीही यात कांही वेळा प्रसंगानुरूप इतर तात्विक चिंतनाचा उल्लेख येवू शकतो .जो विषयाचा आशय स्पष्ट करण्यापुरता मर्यादित असेल.

8) संशोधनाची उपयुक्तता (Utility of Research)

प्रत्येक संशोधन हे त्याची उपयुक्तता सिद्ध करणारे असते.विशेषतः मानवी कल्याण व नव नवीन शोध हा त्या मागचा भाव असतो. सामाजिक शास्त्रातील संशोधन हे देखील अनेक अंगाने उपयुक्त असते. विशेषतः सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करणे, मानवी मन व बुद्धीस चालना देणे ,समाजाला तार्किक व विवेकी बनवणे . सामाजिक अज्ञान दूर करणे .समाजाला एखाद्या विषयाची नव्याने ओळख करून देणे .आपण संशोधन ज्या अभ्यास शाखेंतर्गत करत आहोत त्या अभ्यासशाखेस नवीन संकल्पना, नवीन शब्द ,नवी दिशा देणे.

आपल्या अवती भोवती असणाऱ्या व्यक्तीच्या सामाजिक,राजकीय ,धार्मिक वर्तनाचा अभ्यास करून त्यातील स्वभाव सद्गुण व दोषांचे वर्णन करणे. आपले संशोधन राष्ट्राच्या किंवा शासनास नीती निर्धारण करण्यासाठी उपयुक्त होईल याचा विचार करून होणारे संशोधन उपयुक्त संशोधन असते. तर्क, विवेक ,विज्ञान ,मानवी मुल्य याचा आधार घेवून आपणास पडलेल्या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या दिशेने होणारे संशोधन आपली उपयुक्तता सिद्ध करणारे असते.

प्रस्तुत संशोधन देखील अश्या विविध अंगाने उपयुक्त आहे. कारण या संशोधनात संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या तत्त्वज्ञानाने तत्कालीन व वर्तमानातील कोणत्या सामाजिक ,धार्मिक ,अध्यात्मिक दुर्गुणावर व जीवन जगण्याच्या पद्धतीवर भाष्य केले हे तपासले जाणार आहे.जे मानवी मन व समाजातील सामाजिक व धार्मिक दुर्गुण नष्ट करून आदर्श समाज निर्मितीस संतांचे तत्त्वज्ञान कसे व किती उपयुक्त असते ते संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या तात्विक चिंतनाचा आधार घेवून स्पष्ट केले जाईल.यासाठी वर्णनात्मक व मूल्यात्मक संशोधनाच्या पद्धतीचा आधार घेतला जाईल.

9) संशोधन पूर्व आढावा (Review of Literature)

कोणत्याही विषयावर संशोधन कार्य करताना संशोधकास प्रथमतः त्या विषयावर या अगोदर झालेल्या संशोधन कार्याचा अभ्यास किंवा आढावा घेणे आवश्यक असते .कारण त्या विषयावर संशोधनाची कोणती बाजू ,अंग अदृश्य स्वरूपात आहे ते समजते व त्यावरच प्रकाश टाकून पुढील संशोधन कार्याची दिशा निश्चित करता येते. म्हणून संशोधकाने संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्याशी संबंधित झालेल्या संशोधन कार्याचा शोध घेतला. तेंव्हा संशोधकास असे दिसुन आले की ,संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांचा कालखंड १६ व्या शतकातील आहे.परंतु त्यांच्या जीवन व तात्विक चिंतना बाबत २० व्या शतकापर्यंत अधिक माहिती नव्हती. डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर यांच्या अथक प्रयत्नाने त्यांची ओळख समाजाला झाली. तदनंतर त्यांच्या वर अनेकानी साहित्यिक अंगाने स्फुट स्वरुपात

पहिल्या टप्प्यात लिखाण केले .परंतु संत शिरोमणी मन्मथ स्वामी एक ऐतिहासिक संत, एक तत्त्वज्ञानी , आचार व विचाराची सांगड असलेला मार्गदर्शक अशी मांडणी ती ही तत्त्वज्ञान या अभ्यास शाखेच्या चौकटीत राहून या अगोदर कोणी केली असे मला जाणवले नाही .एक नवीन विषय व संशोधनाच्या क्षेत्रातील वारंवारिता टाळावी म्हणून मी संशोधनासाठी **संत शिरोमणी मन्मथ स्वामींचे तत्त्वज्ञान: एक चिकित्सक अभ्यास** हा विषय निवडला.

10) संशोधनातील अंतर (Research Gap)

संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या दृष्टीकोनातून संशोधनाच्या चौकटीत राहून अभ्यास करण्याचा निर्णय घेतला असता प्रथमतः या विषयावर या पूर्वी झालेल्या संशोधन कार्याचा आढावा घेतला . तो घेत असताना या पूर्वी या विषयावर नेमके कोणत्या अंगाने संशोधन,चिंतन किंवा अभ्यास झाला ? आपणास नेमके काय करायचे आहे ? याचा विचार केला असता असे जाणवले की संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या साहित्यावर साहित्यिक दृष्टीकोनातून व साहित्याच्या संशोधन चौकटीत राहून बरेच लिखाण झाले आहे. परंतु या अभ्यास विषयाच्या चौकटीत राहून तात्विक अंगाने आजतागायत या विषयावर महाराष्ट्र आणि देशातील कोणत्याही विद्यापीठात कार्य झाले नाही. याचा अर्थ या संशोधनात नाविन्यपूर्णता आहे. प्रस्तुत संशोधन हे पूर्व संशोधनातील अंतर स्पष्ट करणारे आहे. जे संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या तात्विक चिंतनातील अनेक नव नवीन पैलु समाजासमोर स्पष्ट करेल हे निश्चित .

11) संशोधन आराखडा (Research Design)

प्रकरण पहिले : प्रस्तावना व विषयप्रवेश

प्रकरण दुसरे : संत शिरोमणी मन्मथ स्वामी : जीवन चरित्र

प्रकरण तिसरे : संत शिरोमणी मन्मथ स्वामी समकालीन तात्विक चिंतन

प्रकरण चौथे : संत शिरोमणी मन्मथ स्वामी सामाजिक तत्त्वज्ञान

प्रकरण पाचवे : संत शिरोमणी मन्मथ स्वामी धार्मिक तत्त्वज्ञान

प्रकरण सहावे : निष्कर्ष व सारांश

परीशिष्ट

12) संदर्भ ग्रंथ यादी

१) देऊळगावकर डॉ.चंद्रकांत (२००३),मन्मथ स्वामी व्यक्ती आणि वाडमय, वाराणसी , शैवभारती ,शोध प्रतिष्ठान जंगमवाडी मठ

२) स्वामी डॉ.भी.शि. (२००३), श्री मन्मथ स्वामींची अभंगवाणी ,लातूर ,सौ.विजया भीमाशंकर स्वामी , शांकरी परिमल गृह निर्माण संस्था औसा

३) डोणगावकर डॉ.वेदप्रकाश ,(२०२०),परमरहस्य विवरण ,हिंगोली ,सौ. एस.व्ही. डोणगावकर ,श्री प्रकाशन

४) पसारकर शे. दे.,(२००१),श्री मन्मथ शिवलिंगकृत परमरहस्य ,वाराणसी, शैवभारती ,शोध प्रतिष्ठान जंगमवाडी मठ

५) कराळे डॉ.शोभा धर्मराज ,(२००३),वीरशैव मराठी अभंग कविता एक विवेचक अभ्यास , वाराणसी , शैवभारती ,शोध प्रतिष्ठान जंगमवाडी मठ

६) घोणसे डॉ.श्यामा, (२००२),वीरशैवांचे मराठी –हिंदी वाङ्मय एक अभ्यास ,वाराणसी , शैवभारती ,शोध प्रतिष्ठान जंगमवाडी मठ

७) मोगलेवार डॉ.सुधाकर ,(१९७७),श्री.शांतलिंग आणि मन्मथ स्वामी परंपरा चरित्र व वाङ्मय,नागपुर, सौ.सुषमा मोगलेवार,बुटी रोड ,सीताबर्डी

८) Swami Shri Kumar, (1960), Mirror of Veershavism ,Dharwar, Nav Kalyan Math

९) Swami Shri Kumar , (1965), Veershaiv Philosophy and Mysticism , Dharwar, Nav Kalyan Math

10) बर्थ ए. (१९६९), दि रिलीजन्स ऑफ इंडिया, न्यू दिल्ली ,एस.चांद अंड कं

11) चमके बी.एम.(१९८५), दि हार्ट ऑफ वीरशैविझम ,बार्शी

12) हस्टींग्ज जेम्स (संपा.),(१९५३), इन सायक्लोपीडीया ऑफ रिलीजन अंड इथिक्स ,खंड ८,३ री आवृत्ती

13) हुनशाळ (डॉ.) एस.एम., (१९५७), वीरशैव सोशल फिलोसोफी, रायचूर ,शास्त्री वीरेश्वर

संशोधन कालावधी दरम्यान प्राप्त तथ्य संकलनानुसार व विषयाच्या वाढत्या आकलनानुसार वरील संशोधन आराखड्यात बदल होवू शकतो .

संशोधक मार्गदर्शक

प्रा.डॉ. उपाडे जी.एम.

तत्त्वज्ञान विभाग प्रमुख

बी.रघुनाथ महाविद्यालय ,परभणी

संशोधक विद्यार्थिनी

सौ.रेणुका रविंद्रप्पा द्याडे

समर्थ नगर ,देगलूर